दै. सकाळ दि. 03-01-2025

# रेजिंग डेनिमित्त विविध कार्यक्रम

**नांदेड, ता. २ :** नांदेड पोलिस दलातर्फे पोलिस स्थापना दिनानिमित्त (रेजिंग डे) दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दोन ते आठ जानेवारीदरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून गुरुवारी (ता.२) सकाळी पोलिस दौडचे आयोजन करण्यात आले होते.




**नांदेड :** पोलिस स्थापना दिनानिमित्त आयोजित दौडचे हिरवी झेंडी दाखवून उद्घाटन करताना पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार.

पोलिस अधीक्षक कार्यालय येथून सकाळी सात वाजता पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून दौडला सुरवात झाली. या दौडमध्ये शहरातील विविध पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, शाखा अधिकारी, क्युआरटी आणि आरसीपीचे पोलिस अंमलदार तसेच पोलिस मित्र, न्यू फोर्स अकॅडमीचे विद्यार्थी आणि विविध महाविद्यालयांतील तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. ही दौड पोलिस अधीक्षक कार्यालयापासून सुरू होऊन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, गांधी पुतळा, गुरुद्वारा चौक, देना बँक, महावीर चौक, वजिराबाद चौक, तिरंगा चौकमार्गे पोलिस मुख्यालयात समाप्त झाली. पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्वतः या दौडमध्ये भाग घेत तरुणांना पोलिस दलाच्या कार्याबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यांनी पोलिस सेवेचे महत्त्व आणि त्यामधील जबाबदाऱ्या समजावून सांगत तरुणांमध्ये प्रेरणा निर्माण केली. या दौडमध्ये पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्यासह अपर पोलिस अधीक्षक सूरज गुरव, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय तसेच अन्य अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दै. गोदातीर दि. 03-01-2025

# पोलीस स्थापना दिनानिमित्त दौड संपन्न; एसपी अबिनाश कुमार यांनी दाखविली हिरवी झेंडी

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा पोलीस दलातर्फे दरवर्षाप्रमाणे याही वर्षी 'रेजिंग डे साजरा केला जात आहे. दि. २ ते ८ जानेवारी दरम्यान वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. त्याचा भाग म्हणुन गुरुवार दि. २ जानेवारी रोजी सकाळी ७ ते ८ वाजेच्या दरम्यान पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या नेतृत्वाखाली दौडचे आयोजन करण्यात आले होते.




या दौडला अबिनाश कुमार यांनी हिरवी झेंडी दाखवुन सुरूवात करण्यात आली. शहरातील सर्व पोस्टेचे पोलीस स्टेशन प्रभारी व शाखा प्रभारी तसेच क्युआरटी, आरसीपी, पोलीस मुख्यालय येथील अंमलदार, तसेच इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तसेच न्यु फोर्स अॅकडमीचे विद्यार्थी सोबतच पोलीस मित्र आणि वेगवेगळया महाविद्यालयाचे तरूण यांनी मोठया संख्येने भाग घेतला होता. सदरची दौड ही पोलीस अधिक्षक कार्यालय येथुन सुरू होवून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, गांधी पुतळा, गुरूव्दारा चौक, देना बैंक, महावीर चौक, वजिराबाद चौक, तिरंगा चौक, पोलीस मुख्यालय, नांदेड येथे दौड संपन्न झाली.

या प्रसंगी अबिनाश कुमार यांनी दौड मध्ये स्वतः भाग घेऊन तरूणांना पोलीस दलाच्या कामाजाबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.

दौडमध्ये पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधिक्षक सुरज गुरव, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय तसेच शहरातील सर्व पोस्टेचे प्रभारी अधिकारी, कर्मचारी यांनी सहभाग नोंदवला होता.